# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

☎ :२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ E-Mail : ropune.dte@gmail.com

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१९/ 1552 दि. 04 APR 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था

विषय – पायाभूत प्रशिक्षण वर्गासाठी नामनिर्देशने पाठविणेबाबत ...

संदर्भ – १.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१७/तंशिसं/प्रशिक्षण/ २०१९/४८ दिनांक २६/०३/२०१९
२.मा.प्रशिक्षण व्यवस्थापक,मानव विकास केंद्र, यशदा,पुणे यांचे पत्र क्र.CHD/2019-20/STP/FTP/HTED/017 Dated 03/04/2019

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये यशदा,पुणे येथे दिनांक २४/०४/२०१९ ते ०४/०६/२०१९ या कालावधीत वर्ग अ मधील अधिकारी वर्गासाठी पायाभूत प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येणार होते. परंतु संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये सदर प्रशिक्षण हे निवडणुका असल्यामुळे पुढे ढकलण्यात आले असलेबाबत कळविलेले आहे.

सबब निवडणुकीनंतर होणा-या पायाभूत प्रशिक्षणासाठी आपल्या संस्थेतील ज्या अध्यापकांचे प्रशिक्षण अद्याप पुर्ण झालेले नाही अश्या अध्यापकांची नावे खालील प्रपत्रामध्ये भरुन दिनांक ०९/०४/२०१९ पर्यंत या कार्यालयांस est.ropune@gmail.com या ईमेलवर न चुकता पाठवावी . तसेच सदर माहिती desk17@dtemaharashtra.gov.in या मेलवर सुद्धा पाठवावी .

| अ.क्र. | अधिका-याचे नांव व पदनाम | संस्थेचे नाव | मोबाईल क्रमांक | ई मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सदर माहिती Microsoft Excel-DV-TTNatraj Font मध्ये तयार करावी.

प्र.सहसंचालक, (सही)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)
Yashwantrao Chavan Academy of Development Administration
(A Government of Maharashtra Organisation)
सत्यमेव जयते
यशदा ISO 9001 : 2008

CHD/2019-20/STP/FTP/HTED/017
एप्रिल ०३, २०१९

प्रति,

मा. संचालक
तंत्र शिक्षण
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७३
मुंबई ४०० ००१.

**विषय - तंत्र शिक्षण संचालनालयातील वर्ग-१ अधिकाऱ्यांसाठी पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम, दि. २४ एप्रिल ते ०४ जून, २०१९**
पुढे ढकलण्याबाबत...

**संदर्भ -** यशदाचे समक्रमांकाचे पत्र, दि. ०७ मार्च, २०१९

महोदय,

उपरोक्त विषयान्वये यशदामध्ये तंत्र शिक्षण संचालनालयातील वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांसाठी पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम दि. २४ एप्रिल ते ०४ जून, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता प्रशिक्षणार्थ्यांच्या नामनिर्देशनासाठी समक्रमांकाच्या पत्राने कळविण्यात आले होते.

०२. परंतु सदरील काळामध्ये निवडणुका असल्याने सदर प्रशिक्षण कार्यक्रम पुढे ढकलण्यात येत आहे. कृपया, याची नोंद घ्यावी, ही विनंती. पुढील तारखा अलाहिदा कळविण्यात येतील.

आपला विश्वासू
(स्वाक्षरी) 03/04/2019
**(विनय कुलकर्णी)**
प्रशिक्षण व्यवस्थापक
मानव विकास केंद्र

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
[date illegible] APR 2019
आवक क्र. 3661



राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे ४११ ००७. भारत (इपीएबीएक्स) : (०२०) २५६०८००० कार्यालयीन वेळेनंतर : २५६०८२७१, फॅक्स : २५६०८१००
Raj Bhavan Complex, Baner Road, Pune 411 007. India (EPABX) : (020) 25608000 After Office Hrs. : 25608271, Fax : 25608100
Email : yashada@vsnl.com contact@yashada.org | Website : www.yashada.org

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

E-mail : desk17@dtemaharashtra.gov.in Web : www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक : १७/तंशिसं/प्रशिक्षण/२०१९/४८

दिनांक : २६.०३.२०१९

**संदर्भ :- १) शासन नि.क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.०९.२०११**

**२) यशदा, पुणे यांचे पत्र क्र.CHD/2019-20/STP/FTP-HTED/017, Dt.07.03.2019**

उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार या कार्यालयातील गट अ व गट ब मधील सर्व अधिकाऱ्यांना शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/तंत्रनिकेतन संस्थातील वर्ग-अ व वर्ग-ब मधील शिक्षकीय/प्रशासकीय अधिकाऱ्यांचे राज्य प्रशिक्षण धोरणा अंतर्गत **पायाभूत प्रशिक्षण**(Foundation Course) व **उजळणी वर्ग** (Refresher course) होणे आवश्यक आहे.

याबाबत संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये यशदा, पुणे यांनी दि.२४.०४.२०१९ ते दि.०४.०६.२०१९ **या कालावधीत होणाऱ्या** पायाभूत प्रशिक्षणासाठी (Foundation Cour) **वर्ग-अ मधील २५ शिक्षकीय/प्रशासकीय अधिकाऱ्यांची नावे** उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

तथापि संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना सूचित करण्यात येते की, आपले विभागातंर्गत येत असलेल्या सर्व संस्था/कार्यालयातील ज्या वर्ग-अ मधील ज्या शिक्षकीय/प्रशासकीय अधिकाऱ्यांचे पायाभूत प्रशिक्षण (Foundation Course) प्रशिक्षण पुर्ण व्हायचे आहे, त्यांची नावे खाली दिलेल्या विवरणपत्र नमुन्यात संचालनालयास उपलबध करुन दयावीत.

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | संस्थेचे नाव | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सदर माहिती दि१० .०४.२०१९ पुर्वी Soft copy (Excel Sheet) मध्ये desk17@dtemaharashtra.gov.in या E-mail Address वर पाठविण्यात यावी. तसेच सदर प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेले जे अधिकारी प्रशिक्षणास उपस्थित राहणार नाहीत, त्यांच्याकडून प्रशिक्षणासाठी करण्यात आलेल्या खर्चाची वसूली करण्यात येईल. जे संस्थाप्रमुख प्रशिक्षणासाठी अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणार नाहीत त्यांना त्यासाठी व्यक्तिश: जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द कार्यवाही शासनाकडे प्रस्तावित केली जाईल. तसेच सदर प्रशिक्षणासाठी जे अधिकारी उपस्थित राहणार नाहीत त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यांत येईल व याबाबतची नोंद संबंधितांच्या गोपनीय अहवाल घेण्यांत येईल याची जाणीव संबंधितांना करुन देण्यांत यावी.


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
APR 2019
आवक क्र....3660......


( डॉ.सुरेश यावलकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव...

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना सूचित करण्यात येते की, परिपत्रकात नमूद केल्यानुसार आपल्या विभागातंर्गत संस्थांना तात्काळ

# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)

## Yashwantrao Chavan Academy of Development Administration
(A Government of Maharashtra Organisation)

सत्यमेव जयते

यशदा®

ISO 9001 : 2008


क्र. CHD/2019-20/STP/FTP-HTED/017

दिनांक : ०७ मार्च, २०१९

प्रति,

**मा. संचालक,**
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग,
पत्र पेटी क्र. १९६७ मुंबई - ००१

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयातील वर्ग - 'अ', चे अधिकारी यांच्याकरिता "पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम" दिनांक : २४ एप्रिल, २०१९ ते ०४ जून, २०१९**
नामनिर्देशने पाठविण्याबाबत...

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं. टीआरएन- ०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि. २३ सप्टेंबर, २०११

महोदय,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार **तंत्र शिक्षण संचालनालयातील वर्ग- 'अ'** चे अधिकारी यांच्याकरिता **"पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम" दि २४ एप्रिल, २०१९ ते ०४ जून, २०१९** या कालावधीत यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

०२. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील शासन सेवेत नव्याने रुजू झालेल्या वर्ग – **'अ' मधील एकूण २५** अधिकाऱ्यांची नावे सदर प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करुन आपल्या स्तरावरून उपस्थित राहण्याचे आदेश व्हावेत, ही विनंती.

०३. या प्रशिक्षणामध्ये उपस्थित राहणाऱ्या प्रशिक्षणार्थींची यशदामधील डीएसी वसतीगृहामध्ये निवासाची व भोजनाची व्यवस्था आरक्षित करण्यात आलेली आहे. प्रशिक्षण कर्यक्रम **दि २४ एप्रिल, २०१९** रोजी सकाळी ०९.३० वाजता सुरु होईल. तत्पूर्वी सदर प्रशिक्षणार्थींना उपस्थित राहण्याच्या सूचना व्हाव्यात, ही विनंती.

०४. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने काही माहिती हवी असल्यास माझे सहकारी श्री. विजय चव्हाण, प्रशिक्षण समन्वयक, यशदा (मो. 9673963388) यांच्याशी संपर्क साधावा. (vijay.chavan@yashada.org)

आपली विश्वासू

**(डॉ.मीनल नरवणे)**
संचालक,
मानव विकास केंद्र व
राज्य प्रशिक्षण नियोजन व
मूल्यमापन यंत्रणा,यशदा